# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष १, अंक २५] बुधवार, सप्टेंबर २, २००९/भाद्र ११, शके १९३१ [पृष्ठे २, किंमत : रुपये २०.००

असाधारण क्रमांक ५३

प्राधिकृत प्रकाशन


**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२, दिनांक २ सप्टेंबर २००९

## अधिसूचना

**राजकीय पक्षाची नोंदणी आदेश, २००९.**

क्रमांक एसईसी/२००९/सी.आर. ४९/डी-११.— ज्याअर्थी, महाराष्ट्र राजकीय पक्षाची नोंदणी आदेश, २००९ च्या परिच्छेद ३(६) मध्ये अशी तरतूद केलेली आहे की, पक्ष नोंदणीच्या अर्जासोबत असिस्टंट कमिशनर, स्टेट इलेक्शन कमिशन, महाराष्ट्र, मुंबई यांच्या नावे रुपये ५,००० (रुपये पाच हजार फक्त) चा मुंबई येथे देय धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) जोडलेला असावा ;

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाची अशी खात्री झाली आहे की, पक्ष नोंदणीसाठी निश्चित केलेली सदरची रक्कम वाढविण्याची आवश्यकता आहे.

त्याअर्थी, आता भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए मधील तरतुदीन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून राज्य निवडणूक आयोग खालील आदेश देत आहे :—

१. या आदेशास महाराष्ट्र राजकीय पक्षाची नोंदणी (सुधारणा) आदेश, २००९ असे म्हटले जाईल.

२. महाराष्ट्र राजकीय पक्षाची नोंदणी आदेश, २००९ च्या परिच्छेद ३ च्या उप परिच्छेद (६) ऐवजी खालील उप परिच्छेद दाखल करण्यात येईल :—

"(६) अर्जासोबत, नोंदणी प्रक्रिया शुल्क म्हणून, असिस्टंट कमिशनर, स्टेट इलेक्शन कमिशन, महाराष्ट्र, मुंबई यांच्या नावे रुपये १०,००० (रुपये दहा हजार फक्त) चा मुंबई येथे देय धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) जोडलेला असावा.".

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

रचना नातू,
उप सचिव.
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

## STATE ELECTION COMMISSION, MAHARASHTRA

1st Floor, New Administrative Building, Opp. Mantralaya, Madam Cama Road, Mumbai 400 032
dated the 2nd September 2009.

*NOTIFICATION*

THE REGISTRATION OF POLITICAL PARTIES ORDER, 2009.

No. SEC/2009/CR-49/D-11.— Whereas, Clause 3(6) of the Maharashtra Registration of Political Parties Order, 2009 provides that an application for registration of a political party shall be accompained by a demand draft of Rs. 5,000 (Rupees Five Thousand only) payable at Mumbai drawn in favour of Assistant Commissioner, State Election Commission, Maharashtra ;

And whereas, the State Election Commission, Maharashtra considers it expedient to increase the said amount of registration fee.

Now, therefore, in exercise of the powers conferred by Article 243-K read with Article 243-ZA of the Constitution of India, the State Election Commission hereby makes the following order :—

1. This order may be called the Maharashtra Registration of Political Parties (Amendment) Order, 2009.

2. In Clause 3 of the Maharashtra Registration of Political Parties Order, 2009 for sub-clause (6), the following sub-clause shall be substituted, namely :—

"(6) The application shall be accompained by a demand draft of Rs. 10,000 (Rupees Ten Thousand only) on account of processing fee payable at Mumbai, drawn in favour of Assistant Commissioner, State Election Commission, Maharashtra, Mumbai.".

By order of the State Election Commissioner,

RACHANA NATU,
Deputy Secretary,
State Election Commission.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004